# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १२९/२०११-१२/ दिनांक :

१) मे. सिध्दराज इंजिनिअरींग प्रा.लि.,
एफ- ५२, एम.आय.डी.सी. शिरोली, कोल्हापूर — अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,
सं व सु मंडळ कार्यालय, कोल्हापूर

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
शहर विभागीय कार्यालय, कोल्हापूर

३) उप कार्यकारी अभियंता,
म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, मार्केटयार्ड, कोल्हापूर — विरुध्द पक्षकार

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

मे. सिध्दराज इंजिनिअरींग प्रा.लि., एफ- ५२, एम.आय.डी.सी. शिरोली, कोल्हापूर यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये आपले प्रतिनिधी श्री. हरिभाऊ दि. खापरे यांचेमार्फत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी शहर विभाग, कोल्हापूर यांचे विरुध्द तक्रार दि. २१.९.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

(१) अर्जदार ग्राहक यांनी वितरण कंपनीकडून एफ- ५२, एम.आय.डी.सी. शिरोली, कोल्हापूर येथे औद्योगिक वापरासाठी वीज कनेक्शन नं. २६७७९००५६७० दि. २४.७.२००३ रोजी घेतले आहे. या नंतर भविष्यातील गरज म्हणून चालू भार २५६ के.व्ही.ए. मध्ये आणखी ९४ के.व्ही.ए. एकूण ३५० के.व्ही.ए. एवढ्या वाढीव भारासाठी ग्राहकाने २००७ मध्ये केलेल्या मागणीसाठी वितरण कंपनीने ही मागणी डी.डी.एफ. योजनेतून मंजूर केली आहे. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार त्यांचा एफ-५२ मधील वाढीव भार व मे. मयुरेश इंजिनिअरींग यांना प्लॉट क्र. एफ-५४ मधील नवीन वीज मागणीसाठी एकत्रित अंदाजपत्रक डी.डी.एफ. मध्ये केलेले आहे. हा वीज पुरवठा घेणे कामी वितरण कंपनीने ग्राहकास क्युबीकल मीटर स्वखर्चाने घेणेची सक्ती लेखी स्वरुपात केली. वास्तविक पहातां, मा. राज्य आयोगाच्या शेड्यूल ऑफ चार्जेस मंजुरी दि. ८.९.२००६ नंतर वितरण कंपनी ग्राहकास मीटर अथवा क्युबीकल मीटर घेणेची सक्ती करु शकत नाही. यासाठी वि.प.चे परिपत्रक क्र. ३४३०७ दि. ३.९.२००७ व मा. लोकपाल यांचा केस क्र. ४६/२००८ मधील दि. २७.८.२००८ आदेश यावर भिस्त ठेवली आहे, आपल्या म्हणण्या पुष्ट्यर्थ जोडले आहेत. वि.प.ने मिटरसाठी ग्राहकाकडून रु. ६७,९५८/- पावती क्र. ००२१३९८ दि. १०.९.२००७ रोजी भरुन घेतले आहेत हे मा. आयोगाच्या आदेशाचे विपरीत आहे. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे दि. १८.६.२०११ रोजी तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाचे दि. २६.७.२०११ रोजी आदेश झाले, त्यामध्ये सदर मीटर क्युबिकलची रक्कम ग्राहकाच्या संमत्तीनुसारच भरुन घेतलेली आहे व ती रक्कम एम.ई.आर.सी.च्या विनियम क्र. २१.१.४ नुसार घेतलेली आहे, ती योग्य आहे. या आदेशाच्या नाराजीने अर्जदार ग्राहकाने प्रस्तुतचे अपील मंचामध्ये दाखल केले. तक्रारीतील पॅरा ८ मध्ये मंचाकडून अपेक्षित मदत - ग्राहकाकडून मीटर क्युबिकलसाठी भरुन घेतलेली रक्कम रु. ६७,९५८/- दि. १०.९.२००७ पासून प्रत्यक्ष परतावा देईपर्यंतच्या कालावधीसाठी १२% व्याजाने बिलातून परतावा मिळावा, परतावा देत असतांना adjustment in electric bills टॅरिफवर आधारित व्याज मिळावे अशी मागणी केली. तक्रारीसोबत पॅरा ९ मध्ये कागदपत्रांची यादी दिली आहे.

(२) वितरण कंपनीचे नोडल ऑफीसर यांनी आपल्या दि.१०.१०.२०११ च्या लेखी अहवालात The consumer has opted for purchase of metering cubicle from MSEDCL, refund of amount paid towards purchase of cubicle was not considered by this Unit, because as per condition No. २१.१.४ of Condition of Supply based on MERC regulations २००५ ‘ when the applicant/ consumer opts to purchase the meter from the MSEDCL, the applicant/consumer shall pay to the MSEDCL the cost of meter based on the Schedule of Charges as approved or as may be approved by the Commission ‘.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी दि. १०.१.२०१२ रोजी तक्रार क्र. १३०/११-१२ मे. मयुरेश इंजिनिअरींग या सोबत घेण्यात आली. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित, नोडल ऑफीसर श्री. रानभरे, सहाय्यक अभियंता श्री. आहुजा, कनिष्ठ अभियंता श्री. आरळे उपस्थित. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी या मंचाने डी.डी.एफ. च्या २१ तक्रार प्रकरणांत आदेश दिले आहेत, त्यापैकी ८ प्रकरणांतील आदेश subjudice आहेत, प्रामुख्याने व्याज देण्याचा वाद वितरण कंपनीने उपस्थित केलेला आहे असे प्रतिपादन केले.

वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी हे वादातील औद्योगिक कनेक्शन असल्याने व्याज देता येणार नाही, ग्राहकाने परस्पर खर्च केलेला आहे, असा बचाव घेतला. यावर ग्राहक प्रतिनिधीने असे प्रतिपादन केले की, मा. आयोगाने व्याज देण्याचे आदेश दिले आहेत, हा इतिहास पूर्वीच्या शेती कनेक्शनच्या डी.डी.एफ. केसेसचा व मा. आयोगाचे आदेश कलम १४२ विद्युत कायदा २००३ खाली आदेशाचा संदर्भ दिल्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित केस क्र. २०३४० मधील आदेश प्रस्तुत केसला लागू होत नाही असे वि.प.च्या अधिकाऱ्यांनी मंचासमोर तोंडी प्रतिपादन केले. त्याचे पुष्ट्यर्थ प्रस्तुत केसमध्ये १५ पानी युक्तीवाद सादर केला. त्यानंतर दि. २.२.२०१२ ला मंचासमोर दोन्ही तक्रारींचा संदर्भ देऊन केस क्र. १२९ व १३० मध्ये कंपनीने WCR सादर करण्यासाठी तसेच विद्युत निरीक्षकांच्या कार्यालयातून ग्राहकाने त्या कार्यालयात भरलेल्या फीचा तपशील मिळविण्यासाठी मुदत द्यावी अशी मागणी केली. दि. १५.२.२०१२ पर्यंत पावती हजर केली नाही. आपल्या लेखी अहवालामध्ये वि.प.ने औरंगाबाद ग्राहक मंच विरुध्द मे. कायगाव पेपर मिल्स लि. मधील आदेश व त्यावरील वितरण कंपनीने मा. उच्च न्यायालयात केलेले रिट पिटीशन मधील ओदश याच्या प्रति उत्तरादाखल जोडल्या आहेत. त्यात असे म्हटले आहे की, वास्तविक मा. राज्य आयोग यांनी पारीत केलेल्या विद्युत पुरवठा संहिता व त्यातील कलम १८ नुसार दिलेली शेड्यूल ऑफ चार्जेस मंजुरी केस क्र. ७०/२००५ दि. ८.९.२००६ मध्ये मा. राज्य आयोग यांनी ३३ केव्ही मीटर अथवा क्युबिकल याचे दर निश्चित केलेले नाहीत.

<u>ANNEXURE ३</u>

All meters are required to be provided by MSEDCL at its own cost. Metering box is to be provided by MSEDCL at its own cost.

श्री. खापरे यांनी मा. लोकपाल यांच्या मे. क्लासिक सिटी इन्व्हेस्टमेंटस् प्रा.लि. विरुध्द वितरण कंपनी यातील दि. ७.६.२०१० च्या आदेशाचा संदर्भ देऊन शेड्यूल ऑफ चार्जेस मंजुरीमध्ये ३३ के.व्ही. मिटरींग क्युबिकल बाबतची दरसूचि मंजूर केलेली नाही असे प्रतिपादन केले. वि.प.ने मा. आयोगाचे केस क्र. ५६/२००७ मधील दि. १६.२.२००८ च्या आदेशाचे पालन केले नाही, तसेच मा. आयोगाचे केस क्र. १४८/११ मधील दि. ७.१.२०१२ चे आदेश आपल्या म्हणण्या पुष्ट्यर्थ जोडले आहेत. ग्राहक प्रतिनिधींनी आपल्या मागणी पुष्ट्यर्थ वि.प.चे वाणिज्य परिपत्रक क्र. १३५/२००७ चा संदर्भ घेतला आहे.

(३) वितरण कंपनीचे अधिकारी व नोडल ऑफीसर यांनी मंचासमोर विद्युत पुरवठ्याची संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ मधील मा. आयोगाने मंजूर केलेल्या व केस क्र. ५६/२००८ मधील आदेशानुसार ग्राहकास विद्युत पुरवठा केलेला आहे असे प्रतिपादन केले. श्री. आहुजा यांनी सर्व्हीस कनेक्शन चार्जेस संदर्भात distance from tap point प्रमाणे धरले जाते असे मंचासमोर सांगितले. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी दि. १०.१.२०१२ ला मंचासमोर दाखल केलेल्या लेखी अहवालात मा. आयोगाच्या केस क्र. २५/२०११ मधील दि. २०.१०.२०११ च्या आदेशाचा संदर्भ घेऊन त्याची प्रत जोडली आहे. वितरण कंपनीने औरंगाबाद ग्राहक मंच विरुध्द मे. कायगाव पेपर मिल्स लि. मधील आदेश व त्यावर वितरण कंपनीने मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे रिट पिटीशन क्र. २०३२/२०११ दाखल केले, त्यात दि. १.७.२०११ ला आदेश झाले. त्यामध्ये तक्रारदाराची मागणी गाऱ्हाणे या व्याख्येत येत नाही असे म्हटले आहे. त्या केसचा संदर्भ घेऊन प्रस्तुतची गाऱ्हाणे या सदरांत मोडत नाही, असा युक्तीवाद करुन तक्रार फेटाळण्यात यावी अशी मागणी केली आहे.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

(४) खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदाराने मागणी केल्याप्रमाणे मिटरींग क्युबिकलची रक्कम रु. ६७,९५८/- ही ग्राहकास परत देण्याचे वि.प.ला आदेश देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

२) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे परताव्याच्या रकमेवर १२% व्याज मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : परताव्याच्या रकमेवर ग्राहकास व्याज मंजूर केले आहे परंतु ते १२% दराने नसून ९% दराने.

३) ग्राहकाची तक्रार मंचासमोर चालू शकते काय ?

उत्तर : नाही

<u>कारणमिमांसा</u>

(५) श्री. हरिभाऊ दिगंबर खापरे यांनी तक्रार क्र. १२९/११-१२ व १३०/११-१२ या सोबत आणखी एक तक्रार मंचाकडे दाखल केली आहे. त्यापैकी केस क्र. १२८/११-१२ सुप्रीम पॅटर्न्स, एमआयडीसी, गोकुळ शिरगाव, कोल्हापूर काढून घेतली आहे. मंचासमोर केस क्र.१२९ व १३० मध्ये एकत्रितरित्या सुनावणी झाली, परंतु प्रस्तुत केस क्र. १२९/११-१२ मे.सिध्दराज इंजिनिअरींग मध्ये मिटरींग क्युबिकलची रक्कम रु. ६७,९५८/- पुरती मर्यादित असल्याने तक्रार स्वतंत्ररित्या निकाली काढणेत येत आहे. त्यामुळे ग्राहक प्रतिनिधी यांनी मंचासमोर केलेले तोंडी प्रतिपादन, लिखित स्वरुपात दिलेले बरेचशे संदर्भ वेगवेगळ्या रकमेबाबत असल्याने त्याचा येथे ऊहापोह केलेला नाही. ग्राहकाने तक्रारीतील पॅरा ९ मध्ये अ.क्र. ८ मध्ये refund of meter cost - Circular No. ३४३०७ dated ३.९.२००७ चा संदर्भ देऊन त्याची प्रत जोडली आहे. त्यामध्ये -

<u>Directives to refund of meter cost</u>

१) Meter cost recovered from ८th Sept. २००६, to till date of all LT/HT consumers for release of new connections is to be refunded immediately.

२) Meter cost shall be refunded to all such consumers through energy bills by giving credit of amount recovered against cost of meter.

३) The meter cost shall be refunded to all new released consumers only.

या ठिकाणी ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे additional load - ९४ KVA हा २००७ मध्ये ग्राहकाच्या मागणीनुसार मंजूर केलेला आहे. ग्राहकाचे जुने कनेक्शन हे जुलै २००३ चे आहे. ग्राहक प्रतिनिधींनी मंचासमोर वि.प.ने ग्राहकास मीटर आणण्याची सक्ती केली, लेखी बंधन घातले असे प्रतिपादन केले, कारण ग्राहकाने स्वत: मीटर आणला असे सांगण्याचा वि.प.ने प्रयत्न केला. कोणत्याही केसमध्ये ग्राहकाने मिटरसाठी खर्च केला असल्यास असा खर्च मा. आयोगाने मंजूर केलेल्या शेड्यूल ऑफ चार्जेसच्या व्यतिरिक्त असल्याने ते वि.प.ने परत करणे संयुक्तिक व योग्य आहे, कारण याबाबत मा. आयोगाचे केस क्र. ७०/२००५ मध्ये दि. ८.९.२००६ चे आदेश आहेत.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

आपल्या तक्रारीत पान क्र. ४ पॅरा ५ मध्ये

५) <u>Cost of Meter and Meter Box</u>

५.१ The company shall not recover any cost towards meter and meter box, except where the consumer opts to purchase meter from MSEDCL and in case of lost and burnt meter, the company is permitted to recover cost as per Annexure-३.

५.२ The field officers shall note that the cost of the meter is recoverable only when a consumer elects to purchase the meter from the company or in case of lost and burnt meter. The recoverable charges approved by the Commission shall be as per Annexure ३.

वि.प.ने मंजुरीच्या आदेशामध्ये Annexure B पान नं. ३ पॅरा ११ मध्ये ग्राहकास मिटरींग क्युबिकल खरेदी करणेसाठी लेखी सूचना दिल्या आहेत.

Work to be carried out by consumer.

Clause(e) : ११ kv metering cubicle ( Kiosk) as per order specification.

त्यामुळे ग्राहकाचे म्हणणे वितरण कंपनी मिटरींग क्युबिकलची रक्कम रु. ६७९५८/- परत करणेस बांधील आहे व ग्राहकाचा तो हक्क आहे हे म्हणणे मान्य करावे लागेल असे मंचाचे मत आहे.

मा. लोकपाल यांनी दि. ७.६.२०१० च्या केस क्र. ६१/२०११ मे. क्लासिक सिटी इन्व्हेस्टमेंट प्रा.लि. विरुध्द महावितरण मधील आदेशाच्या पॅरा १५ मध्ये असे निरीक्षण केले आहे की,

Before parting with the order, it must be put on record that inspite of the Commission's clear order on Schedule of Charges, the distribution licensee appears to have ignored the provision in this behalf and asked the consumer to buy / procure metering cubicles or meters, in contravention of the ' Schedule of Charges '. This causes avoidable hardship and at times, harassment to the consumers at large.

मा. लोकपाल यांच्या सदरील केसमधील घटना / वस्तुस्थिती पहांता, अर्जदार हे वितरण कंपनीचे उच्चदाब ग्राहक आहेत, त्यांनी नागपूर ग्राहक मंचाकडे मिटरींग क्युबिकल व इतर वेगवेगळे चार्जेस भरुन वीज जोडणी घेतली. त्यानंतर मा. आयोगाचे आदेश पारीत झाल्यावर सदरच्या रकमा परत मिळण्यासाठी अर्ज केला. त्यामध्ये मंचाने रु. १,०८,७३१/- मिटरींग क्युबिकल रकमेचा परतावा मंजूर केला, ग्राहकाची मागणी रु. २,१३,०९८/- ची होती. पॅरा ९ मध्ये मंचाने असे निरीक्षण केले आहे की,

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

It is not disputed that CT & PT unit fixed in the metering cubicle is a part and parcel of the metering equipment. Since, the meter is required to be provided free of cost by the distribution licensee to the consumer, it automatically follows that every part of the metering equipment, including the metering cubicle, is required to be so provided free of cost by the distribution licensee to the consumer.

या निष्कर्षाच्या पुष्टयर्थ -
Regulation १४ of the Maharashtra Electricity Regulatory Commission (Electricity Suppy Code and other Condition of Supply) Regulations २००५, clearly provides that excess where the consumer elects to purchase a meter, the distributon licensee may require the consumer to provide security for the price of the meter in accordance with the provisions of Clause (b) sub section (१) of section ४७ of the Act. In addition, Regulation ६(२) of the Central Electricity Authority (Instlalation and Operation of Meters) Regulations, २००६ चा संदर्भ घेतला आहे.

प्रस्तुत केसमध्ये वितरण कंपनीचे म्हणणे ग्राहकाचा ३३ केव्ही सप्लाय असल्याने त्या अनुषंगाने मिटरींग क्युबिकल त्यास योग्य आहे. आजतागायत पारीत झालेल्या मा. आयोगाच्या आदेशामध्ये मा. आयोगाने मंजूर शेड्यूल ऑफ चार्जेस Annexure ३ मध्ये ११ केव्ही व २२ केव्ही क्युबिकलचाच संदर्भ घेतला आहे, ३३ केव्हीचा नाही. मा. लोकपाल यांनी आपल्या आदेशातील पॅरा १५ मध्ये पुढे असे निरीक्षण केले आहे की,
It may be advisable that respondent may approach the Commission to get the cost of ३३kv metering cubicle, etc. approved by the Commission.

मा. लोकपाल यांनी पॅरा १२ मध्ये शेवटी
Therefore the respondent's action of asking appellant to procure the metering cubicle at his cost was ab initio incorrect and illegal.
वि.प.ने ग्राहकाच्या ११ केव्ही किंवा २२ केव्ही पेक्षा जास्त मंजूर भार या संदर्भात मा. आयोगाकडे कांही कार्यवाही किंवा कृती केल्याचे मंचाच्या निदर्शनास आणले नाही, त्यामुळे ग्राहकास मागणी केल्याप्रमाणे रक्कम रु. ६७९५८/- परत करण्याचे आदेश देणे योग्य होईल. मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे.

अंतर्गत कक्षाने आपल्या आदेशात सदर मीटर क्युबिकलची रक्कम ग्राहकाच्या संमत्ती-नुसारच भरुन घेतलेली आहे व ती रक्कम एम.ई.आर.सी.च्या विनियम क्र. २१.१.४ नुसार घेतलेली आहे, ती योग्य आहे असे म्हटले आहे.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

मा. आयोगाची केस क्र. १४८/११ मधील दि. ५.१.२०१२ च्या आदेशात पॅरा ९ (a)मध्ये असे निर्देश दिले आहेत की,

(a) According to Regulation १९.२ of MERC (Electricity Supply Code and Other Conditions of Supply) Regulatons, २००५, every Distribution Licensee shall, within a period of four months from the date of notification of the Supply Code Reglations, modify and update the terms and conditions of supply and all circulars, orders and any other document or communication relating to the supply of electricity to consumers and to make them consistent with the Supply Code Regulations.

(b) The Commission is prima facie satisfied that this issue is also equally important for the rest of the supply area of MSEDCL and hence advises MSEDCL to formulate a committee consisting of high ranking officers wih the agenda to correct the old practices, inadvertent mistakes occurred and confusion such as interpretation of dedicated distribution facility and service connection etc., during the course of office working in implementing the MERC Orders/Regulations.The Commission once again directs MSEDCL to review all its circulars, orders and any other document or communication relating to the supply of electricity to consumers and to ensure that all are consistent with the Electricity Act, २००३ and MERC Regulations.

त्यामुळे या वि.प.च्या बचावाला कांही अर्थ नाही.

(६) वि.प.च्या अधिकाऱ्यांनी मंचासमोर सुनावणीचेवेळी मा. आयोगाचे केस क्र. २५/२०११ मधील दि. २०.१०.२०११ च्या आदेशाचा संदर्भ देऊन प्रस्तुतची तक्रार गाऱ्हाणे सदरात मोडत नाही, फेटाळण्यात यावी असे म्हटले आहे. वितरण कंपनीने मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे रिट पिटीशन क्र. २०३२/२०११ दाखल केले, त्यात दि. १.७.२०११ ला आदेश झाले.

ग्राहकाने २ वेळेस विद्युत भार वाढवून मिळणेसाठी वि.प.कडे अर्ज केले. त्यासाठी कांही साधनसामुग्री कंपनीच्या प्रिमायसेसमध्ये बसविण्यात आली. ग्राहकाने त्या रकमेचा परतावा मिळावा अशी मागणी केली आहे. वि.प.चा बचाव फेटाळण्यात येवून तक्रार मंजूर करण्यात यावी अशी मागणी केली आहे. त्या विरुध्द वि.प.ने उच्च न्यायालयात ग्राहकाची मागणी ' गाऱ्हाणे ' होऊ शकत नाही असा कायद्याचा मुद्दा उपस्थित केला तो उच्च न्यायालयाने मंजूर करुन आदेश रद्द केले.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

मा. आयोगाने आपल्या दि. २०.९.२०११ च्या केस क्र. २५/२०११ मधील आदेशामध्ये औरंगाबाद मंचासमोरील तक्रारीचा पॅरा २ मध्ये आढावा घेतला आहे. ग्राहकाने सदर तक्रारीमध्ये वि.प.कडून रु. २,८९,२१३/- परत मिळावेत अशी मागणी केली. मंचाने ३३ केव्ही केबलची किंमत रु. १,७२,२५०/-, ३३ केव्ही ५०/५ अॅ. सिटीज् - ३ नग रु. - ५३,३४१/- असे एकूण रु. २,२५,५९१/- वीज बिलातून परत देण्याचे आदेश दिले. त्यामध्ये मा.उच्च न्यायालयाचे आदेशामधील पॅरा ७ चा संदर्भ देऊन ग्राहकाचा अर्ज फेटाळण्यात आला आहे.

In view of this, without expressing any view on merits of the claim/ defence/ Forum's decision, I am inclined to allow this petition. The Writ Petition is allowed. The impugned order of the Forum stands set aside. The amount deposited by the Petitioner shall be refunded to them.

वि.प.च्या अधिकाऱ्यांनी मा. विद्युत नियामक आयोगाची केस क्र. २५/२०११ मधील दि. २०.१०.२०११ च्या आदेशाचा संदर्भ घेतला आहे. त्यामध्ये औरंगाबाद मंचाच्या आदेशाची अंमलबजावणी व्हावी यासाठी ग्राहकाने विद्युत कायदा २००३ कलम १४२ खाली तक्रार दाखल करुन मागणी केली आहे. मंचाने केस क्र. २०३२/२०११ मधील दि. १.७.२०११ च्या औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशाचे अवलोकन केले असतां, पान क्र. ४ पॅरा ५ मध्ये असे निरीक्षण केले आहे की,

" By no stretch of imagination the grievance of respondent No. 1, mentioned above, would be covered by this definition. A consumer's grievance contemplated under the Regulations is basically a complaint about fault or inadequacy in quality of performance of the Electricity Distribution Company. In this case, admittedly, there is no grievance that performance of the petitioner- company, as distribution licensee, had been imperfect or otherwise. The grievance of respondent No. 1 is in respect of breach of statutory obligation allegedly committed by the petitioner-company. So, the grievance would not fall within the four corners of the term " grievance " defined under the Regulations.

" Taking into consideration submission of consumers Advocate who tried to show certain orders passed by M.E.R.C. in the matter of complaint filed by certain consumers of the petitioner company for refund of amount etc. The Commission directed the petitioner – company to refund the amount to the consumer in those cases.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

I am afraid, even though in similar situation, the petitioner – company was directed by the Commission to refund the amount to their consumers, still such orders are not capable of being utilized as precedent. It is further observed -

I have made sufficiently clear above that the dispute between the parties is of civil nature and would not be covered by the term ' grievance '. The Consumer Grievance Redressal Forum, which has passed the impugned order, apparently did not have jurisdiction to entertain a complaint of this nature. Respondent No. 2 – Forum thus could not have decided the dispute of this nature. Therefore, the orders passed by the Commission will be of no use to respondent No. 1. The Writ Petition is allowed. The impugned order of the Forum stands set aside."

मंचाच्या आदेशातील निरीक्षण असे आहे की, मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशानंतर औरंगाबाद ग्राहक तक्रार निवारण मंचाने केस क्र. ३४३/२०११ मे. माऊली कॉटेक्स विरुध्द अधीक्षक अभियंता, महावितरण, ग्रामीण मंडल, औरंगाबाद मधील दि. १९.१०.२०११ च्या आदेशामध्ये ग्राहकाची मागणी मंचाच्या कार्यकक्षेत येत नाही असे मत नोंदवून ग्राहकाची तक्रार Grievance is not tenable for want of subject matter of jurisdsiction असे आदेश केले आहेत. तसेच नागपूर ग्राहक मंच, नागपूर अर्बन झोन यांनी केस क्र. ०३२/२०११ मध्ये दि. २.९.२०११ च्या आदेशानुसार तक्रारदाराचे गाऱ्हाणे मंचासमोर चालू शकत नाही असे निरीक्षण केले आहे.

Therefore, Forum holds that present grievance application is untenable before this Forum. This Forum has no jurisdiction to decide present grievance application and grievance of the applicant deserves to be dismissed.

तसेच त्यापूर्वी केस क्र. ०२९/२०११ मधील दि. २६.८.२०११ च्या आदेशामध्ये नागपूर मंच, नागपूर अर्बन झोन यांनी अशाच प्रकारचे आदेश केले आहेत. त्यामुळे मुद्दा क्र. ३ चे उत्तर नकारार्थी हे मंच नोंदवित आहे. तक्रार Tenable नाही, तक्रारीतील मागणी मंचाचे कार्यकक्षेत येत नाही, त्यामुळे प्रस्तुतची तक्रार मंचासमोर चालू शकत नाही. सुनावणी दरम्यान वि.प.चे अधिकाऱ्यांनी अर्जदाराची रक्कम रु. ६७९५८/- ही डिसेंबर, २०११ चे बिलात समायोजित केली असल्याचे सांगितले, त्याची बीलेही मंचसमोर त्यानंतर हजर केली. त्यामुळे ग्राहकाची व्याजाची मागणी तक्रार चालू शकत नसल्यामुळे मंच विचारांत घेऊ शकत नाही. तक्रारीमध्ये दि. १०.९.२००७ पासून प्रत्यक्ष परतावा मिळेपर्यंतच्या कालावधीतील विलंबापोटी १२% व्याजाची मागणी फेटाळण्यात येत आहे. पर्यायाने तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

## आदेश

१) तक्रार फेटाळण्यात येत आहे.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा.विद्युत लोकपाल, केशवा.बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com